तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क.शिउसं/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८-१९/ 203

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- 11 MAR 2019

प्रति

अध्यक्ष/सचिव,

खडकी कटक मंडळ, खडकी, पुणे

विषय - सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्थेस माध्यमिक शाळा सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नमाशा-२००९/(४९७/०९)/माशि-१ दिनांक ११ जुन २००९

३. शासन निर्णय क्रं. एसएफएस-२०१८/प्र.क्र.१५७१/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ दि. १६.०१.२०१९

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | खडकी कटक मंडळ, खडकी, पुणे | कर्नल भगत इंग्लिश स्कुल, खडकी, पुणे | इंग्रजी | नविन शाळा (राज्यमंडळ ) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी) | २०१८-१९ |

## अटी व शर्ती :-

१. सदर शाळेचा खर्च कटक मंडळाने स्वतःच्या उत्पन्नातून/स्वनिधीतून सुरू करावा राज्य शासनावर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कोणत्याही प्रकारचे आर्थिक दायित्व न येता सदर शाळा सुरू करावी.

२. माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांबाबतचे शासनाचे प्रचलित धोरण व निकष यांचे पालन करणे तसेच शाळेमध्ये आवश्यक वर्गखोल्या, सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे अनिवार्य राहील.

३. शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणा-या निदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. परवानगी दिलेल्या शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या भरती संदर्भात शासनाचे प्रचलित आदेश, नियम व धोरण लागू राहील.

(मिनाक्षी राऊत)

प्र.शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, खडकी कॅन्टोमेंट बोर्ड, खडकी, जि पुणे

३. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.